


Sampark Sahyog Sanskar Sewa Samarpan

# SAHYOG - PAATRA

## Bharat Vikas Parishad

### Shivajinagar Charitable Trust

Trust is Affiliated to Bharat Vikas Parishad

**BVP**
Shivajinagar Charitable Trust

## Objectives

- Serving the Divyang by providing them artificial limbs.
- Integrated village development by supporting schools and villages with various amenities.
- Conduct Blood Donation Camps.
- Conduct Medical Camps in fringe villages around Pune.
- Support and serve community during Pandemic and National calamities.

Bharat Vikas Parishad is a service and culture-oriented non-political, socio-cultural voluntary organization, which, adopting the ideals of Swami Vivekananda, is working for the all-round progress of India in all spheres of human life (culture, society, education, policy, spirituality, patriotism, etc. ) Its motto is - "Healthy, Strong, Sanskarit India".

BVP Shivajinagar Charitable Trust is a registered Charitable Trust managed by Bharat Vikas Parishad, Shivajinagar , Pune branch.The Trust activities are conducted keeping in mind the motto of Bharat Vikas Parishad i.e Sampark Sewa, Sahyog, Sanskar and Samarpan.



**BVP**
Shivajinagar Charitable Trust

## Rural Education Initiative

Education opens up many new avenues for entering the new information and technology era, which helps a person to make competent and right decisions in personal and professional spheres.

Education helps children understand policies, rights, laws from an early age, which will be useful for them in the future. Since 65% of India's population lives in rural areas, focusing on rural education will help boost the overall economy. With an aim to provide a stable platform to the students living in and around Tamhini village in Mulshi and to provide them with continuous education, BVP Shivajinagar Charitable Trust has adopted Sant Gadgebaba Hostel of Shri Vinzhai Devi High School, Tamhini and Chhatrapati Shivaji Maharaj Hostel, affiliated to Swami Vivekananda Vidyalaya, Shileshwar, Asade for the students living in the hilly areas.



**BVP**
Shivajinagar Charitable Trust

## Student Hostels in Remote Areas

To solve the transportation and travel challenges for students living in remote hilly areas, BVP Shivajinagar Charitable has adopted Sant Gadge Baba Children's Hostel and Shri Chhatrapati Shivaji Maharaj Hostel. BVP Shivajinagar Charitable Trust is taking care of 60 tribal students from class 5th to class 10th studying in Shri Vinzhai Devi High School and also bears all the expenses of 55 students in the hostel attached to Swami Vivekananda Vidyalaya.

- Beds have been provided for 90 students.
- We are providing daily meals (breakfast, lunch, dinner) to all the students in the hostel.
- We are taking initiatives like maintaining the library, maintaining the playground and providing various sports equipment for the students in the hostel.
- We are constructing new rooms in the hostel as per the requirement, and providing annual supply of notebooks and exercise books to the students from time to time.
- Rs. 35 lakhs have been spent on constructing a mess cum study facility, installing a solar plant for uninterrupted power supply, providing solar water heater facilities etc.
- We are providing educational and skill guidance with the help of teachers from Gyan Prabodhini.

**BVP**
Shivajinagar Charitable Trust

**Due to the accommodation facilities in our hostel, many children from poor families in remote mountainous areas without roads were able to get education, which not only brought about the progress of that family but also of that village. Some examples of such students are given below in a few words.**



Name:-Bhau Margale.
During a Dhangar gathering,
Name of the village:-(3000 feet high mountain plateau "Vegre" (Dhangar settlement)
Because of staying in our hostel, he was able to study till graduation. Later, he completed MSW. At the age of 20, he became the youngest Sarpanch of the taluka. Due to the development work in the village, he was selected as the "Ideal Sarpanch". Some of the improvements he could achieve ie. electricity to the village, for women empowerment he could register the name of the woman in the family as the owner on property card for all of houses in the village , installed solar lights, brought discipline in the management of the taluka's credit union.



Name:- Azam Sheikh.
During a felicitation after completing his PhD,
Village:- "Bhare". He completed his school and college education by staying in our hostel. He got a gold medal from Pune University in Chemistry and did his MSc Later, he got the scholarship to go abroad and do his PhD. After completing his PhD, he worked as a scientist in Japan. But he left the job opportunity in America and returned to his homeland and settled.



Name:- Ajay Mahadik
Village:- Kondhur. Both his mother and father died when he was in seventh grade. The villagers brought this orphan boy to our hostel. We took care of him in the hostel and completed his entire school education. Today he is working and standing on his own feet.

**BVP**
Shivajinagar Charitable Trust



Name:- Santosh Gore
Village:- A small village called "Nive" on the edge of the Sahyadri in Tamhini Ghat.
Father and mother are uneducated farmers. Santosh studied till tenth grade in a school near his village. For further education, he had to come either to Pune or to Pirangut. This was not possible due to financial difficulties. He gave up his education and started helping his father in farming. While grazing the family's cattle, a tourist inquired about him and told him the address of our hostel. When Santosh's father came to us looking for him, we admitted Santosh to the hostel. And after that, Santosh studied hard and completed his education up to B.E. Today, he is working as a civil contractor in Mulshi taluka and has made remarkable progress in it.





Name:- Kailas Kokare.
Village:- Wegre
House in the mountains
Kailas Kokare participating in the mini marathon in America.
His father's occupation is farming and sheep farming. Since the village is on the hill, there is no school. He was admitted to our hostel for education. He has been disabled since his right hand was burnt in a stove as kid. Thanks to the hostel, he was able to complete his school education. Due to his brilliant intellect, an organization gave him a scholarship and sent him to America for higher education. Since he was in the hostel, he has been interested in participating in running races. Therefore, even while he was in America, he participated in a mini marathon and ranked among the first 15 competitors. After higher education, he now works in an organization in Bangalore, India..

**During their college education, we had provided free accommodation in Pune for all the above students. Therefore, they could complete their college education.**

**In the above example, there are four types of children, such as shepherds, farmers, cowherds and orphans, who would have been completely deprived of education due to their circumstances. These are just four examples that show how they, their families and even the village can develop by getting the support of a hostel. We have many such experiences but due to lack of space, it is not possible to give them all here. Thank you.**

**BVP**
Shivajinagar Charitable Trust

## Appeal

The annual cost of running the hostel is approximately Rs. 25 lakhs. "To meet the daily food expenses of the students of Sant Gadgebaba Hostel and Shri Chhatrapati Shivaji Maharaj Hostel for approximately 325 days, BVP Shivajinagar Charitable Trust has started the **Sahyog-Patra** scheme. The success of the scheme depends on the heartfelt support of philanthropists like you. The food expenses of the students in this hostel are approximately Rs. 7,500/- per day. We humbly appeal to you to donate at least Rs. 7,500/- for one day or multiple of that amount for this noble cause and contribute to the national cause of rural education.




**BVP**
Shivajinagar Charitable Trust

Trust Details :
**BVP Shivajinagar Charitable Trust**
Prestige Corner, First Floor, Shailesh Society, Karve Nagar, Pune 411052
Regd No: E-8191 / PUNE , Dated 11 June 2018
80 G Registration Number: CIT EXEMPTION, AADTB1160DF20192
PAN: AADTB1160D
CSR Certificate No: CSR00003908
The donation can be made by Cheque in favor of
**" BVP Shivajinagar Charitable Trust "**

The Bank Details are as follows:

**Account Name:** BVP Shivajinagar Charitable Trust
**Account Number :** 033805011859
**Bank Name:** ICICI Bank, Kothrud Branch
**IFSC:** ICIC0000338

**Note:** Any donations made areeligible for income tax exemption u/s 80(G) of the Income Tax Act*Please provide your PAN details and transaction reference ID, Net Banking, UPI transaction to - bvpshivajinagartrust@gmail.com

**UPI Payments Accepted Scan below QR code**

or Pay to eazypay
B9RBNPABVYG5R4Z@icici






संपर्क सहयोग संस्कार सेवा समर्पण

# सहयोग-पात्र

भारत विकास परिषदेशी सलग्न

## बीव्हिपी शिवाजीनगर चॅरिटेबल ट्रस्ट

Reg No:E-8191/PUNE



## उद्दिष्टे :

- ❑ दिव्यांगांना विनामूल्य कृत्रिम अवयव देऊन सेवा देणे.
- ❑ गावांना आणि शाळांना विविध सुविधा पुरवून एकात्मिक गाव विकास करणे.
- ❑ रक्तदान शिबिरे आयोजित करणे.
- ❑ पुण्याच्या आसपासच्या गावांमध्ये वैद्यकीय शिबिरे आयोजित करणे.
- ❑ साथीचे रोग आणि राष्ट्रीय आपत्तींच्या वेळी विविध सामाजिक उपक्रम हाती घेऊन सेवा पुरवणे.

भारत विकास परिषद ही एक सेवा आणि संस्काराभिमुख अराजकीय, सामाजिक तसेच सांस्कृतिक स्वयंसेवी संस्था आहे. आमची संस्था भारताच्या सर्वांगीण प्रगतीसाठी स्वामी विवेकानंदांच्या आदर्शांचा अंगीकार करून निरोगी, सशक्त, सुसंस्कृत भारत बनवण्यासाठी संस्कृती, समाज, शिक्षण, धोरण, अध्यात्म, देशभक्ती अशा सर्व क्षेत्रात कार्यरत आहे.

बीव्हिपी शिवाजीनगर चॅरिटेबल ट्रस्ट हा भारत विकास परिषद, शिवाजीनगर, पुणे शाखेद्वारे स्थापित एक नोंदणीकृत चॅरिटेबल ट्रस्ट आहे. ट्रस्टचे उपक्रम संपर्क, सेवा, सहयोग, संस्कार आणि समर्पण ह्या भारत विकास परिषदेचे ब्रीदास अनुलक्षून आयोजित केले जातात.







## ग्रामीण शिक्षण उपक्रम

शिक्षणामुळे नवीन माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रवेश करण्याच्या दृष्टीने अनेक नवनवीन संध्या उघडतात ज्यामुळे एखाद्या व्यक्तीला वैयक्तिक आणि व्यावसायिक क्षेत्रामध्ये सक्षमपणे योग्य ते निर्णय घेण्यास सुकर होते. शिक्षणामुळे मुलांना लहानपणापासूनच धोरणे, अधिकार, कायदे समजून घेता येतात जे त्यांना भविष्यात उपयुक्त ठरते. भारतातील ६७% लोकसंख्या ग्रामीण भागात वसलेली असल्याने, ग्रामीण शिक्षणावर भर दिल्यास एकूण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल. मुळशी येथील ताम्हिणी गावात आणि आसपास राहणाऱ्या विद्यार्थ्यांना एक स्थिर व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांना सातत्याने शिक्षण मिळावे या उद्देशाने, बीव्हिपी शिवाजीनगर चॅरिटेबल ट्रस्टने डोंगराळ भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ताम्हिणी येथील श्री विंझाई देवी हायस्कूलचे संत गाडगेबाबा हे वसतिगृह तसेच शिळेश्वर, असदे येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाशि संलक्ष छत्रपती शिवाजीमहाराज वसतीगृह दत्तक घेतले आहे.







## दुर्गम भागातील विद्यार्थी वसतिगृहे

अतिदुर्गम डोंगराळ भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाहतूक आणि प्रवासाचे आव्हान सोडवण्यासाठी बीव्हीपी शिवाजीनगर चॅरिटेबलने संत गाडगे बाबा मुलांचे वसतिगृह तसेच श्री छत्रपती शिवाजीमहाराज वसतिगृह दत्तक घेतले आहे. श्री विंझाई देवी हायस्कूलमध्ये शिकत असलेल्या इयत्ता ५वी ते इयत्ता १०वी वयोगटातील ६० आदिवासी विद्यार्थ्यांच्या देखभालीची तसेच संपूर्ण जबाबदारी तसेच स्वामी विवेकानंद विद्यालयाशी संलक्ष वसतिगृहातील ५५ विद्यार्थ्यांचा सर्व खर्च बीव्हीपी शिवाजीनगर चॅरिटेबल ट्रस्ट करत आहे.

### पूर्णत्वास नेलेली कामे:

- ९० विद्यार्थ्यांसाठी बेड उपलब्ध करून दिले आहेत.
- वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांना रोजचे जेवण (नाश्ता, दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण) देत आहोत.
- वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी वाचनालयाची देखभाल करणे, खेळाच्या मैदानाची देखभाल करणे आणि विविध क्रीडा उपकरणे प्रदान करणे इ. उपक्रम करत आहोत.
- वसतिगृहात गरजेनुसार नवीन खोल्या बांधणे, विद्यार्थ्यांना वह्या व नोटबुकचा वार्षिक पुरवठा वेळोवेळी करत आहोत.
- रु. ३५ लाख खर्चून मेस कम स्टडी सुविधा तयार करणे, अखंडित वीज पुरवठयासाठी सोलर प्लांट बसवणे, सोलर वॉटर हिटरची सुविधा इ. कामे केली आहेत.
- ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षकांच्या मदतीने शैक्षणिक आणि कौशल्य मार्गदर्शन प्रदान करत आहोत.





नाव :- संतोष गोरे
गावाचे नाव :- ताम्हिनी घाटातील सह्याद्रीच्या कड्यावरील निवे नावाचे एक लहानसे गाव.
वडील आई अशिक्षित शेतकरी. संतोषचे दहावी पर्यंत शिक्षण त्याच्या गावाजवळच्या शाळेत झाले .पुढील शिक्षणासाठी त्याला पुण्यास किंवा पिरंगुट येथे येऊन राहणे गरजेचे होते. ते आर्थिक अडचणींमुळे शक्य नसल्याने. शिक्षण सोडून देऊन वडिलांना शेतीकामात मदत करू लागला. घरची गुरे चारत असताना एका पर्यटकाने त्याची चौकशी केली असता त्यांना, गरिबीमुळे संतोषला शिक्षण अर्धवट सोडावे लागल्याचे समजताच त्यांनी आमच्या वासितीगृहाचा पत्ता सांगितला . तो शोधत संतोषचे वडील आमच्या कडे आल्यावर आम्ही संतोषला वसती गृहात प्रवेश दिला .आणि त्यापुढे संतोषने कष्टपूर्वक अभ्यास करून B.E. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. आज तो मुळशी तालुक्यात Civil Contractor म्हणून व्यवसाय करीत असून त्यात उल्लेखनीय प्रगती केली आहे.



नाव :- कैलास कोकरे .
गाव :- वेगरे
डोंगरातील घर
अमेरिकेतील mini marathon मध्ये भाग घेतेताना कैलास कोकरे .



वडीलांचा व्यवसाय शेती व मेंढीपालन. गाव डोंगरावर असल्याने शाळा नाही .शिक्षणासाठी आमच्या वसतिगृहात प्रवेश दिला . तान्हेपणी उजवा हात चुलीत भाजून जळला तेव्हापासून दिव्यांग. वसतीगृहामुळे शालेय शिक्षण होऊ शकले .तल्लख बुद्धीमुळे एका संस्थेने शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवले.वसतिगृहात असल्यापासून धावण्याच्या शर्यतीती भाग घेण्याची आवड.त्यामुळे अमेरिकेत असतानाही mini marathon मध्ये भाग घेऊन पहिल्या १५ स्पर्धकात क्रमांक मिळवला. उच्च शिक्षणानंतर आता भारतात बंगलोर येथे एका संस्थेत नोकरी करतो.

**वरील सर्व विद्यार्थ्यांच्या कॉलेज शिक्षणाचे वेळी आम्ही त्यांची पुण्यामध्ये मोफत राहण्याची सोय केली होती .म्हणून त्यांचे कॉलेजचे शिक्षण सुद्धा पूर्ण होऊ शकले.**

**वरील उदाहरणात मेंढपाळ , शेतकरी ,गुराखी आणि अनाथ अशा चार पाच प्रकारची मुले , जी परिस्थितीमुळे शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहिली असती . अशांना वसतिगृहाचा आधार मिळाल्याने त्यांचा , त्यांच्या कुटुंबाचा व गावाचा सुद्धा कसा विकास होऊ शकतो हे दाखवणारी ही मोजकी चार उदाहरणे आहेत. असे अनेक अनुभव आमच्या कडे आहेत .जागे अभावी सर्व येथे देणे शक्य नाही. क्षमस्व आणि धन्यवाद .**



## यशोगाथा

आमच्या वसतिगृहात राहण्याची सोय झाल्यामुळे, रस्ते सुद्धा नसलेल्या दुर्गम डोंगर भागातील अनेक गरीब कुटुंबातील मुलांचे शिक्षण होऊ शकले त्यामुळे फक्त त्या कुटुंबाचीच नव्हे तर त्या वस्तीचीही प्रगती झाली. अशा विद्यार्थ्यांपैकी काही उदाहरणे मोजक्याच शब्दात पुढे दिली आहेत.



नाव :- भाऊ मरगळे. एका धनगर मेळाव्याचे वेळी
गावाचे नाव :- (३००० फूट उंचीवरील डोंगर पठारावरील वेगरे ( धनगर वस्ती)
आपल्या वसतिगृहात राहिल्यामुळे पदवी पर्यंत शिक्षण होऊ शकले. नंतर MSW पूर्ण केले. वयाच्या २० व्या वर्षी, तालुक्यातील सर्वात तरुण सरपंच झाला. गावातील विकास कामांमुळे आदर्श सरपंच म्हणून निवड झाली.त्याने केलेल्या गावातील काही सुधारणा :- गावात वीज आणली,महिला सशक्तीकरणाच्या उद्देशाने सर्व घरांच्या उताऱ्यावर मालक म्हणून कुटुंबातील महिलेच्या नावाची नोंद केली, गावात सौर दिवे बसवले, तालुक्यातील पतपेढी च्या कारभारात शिस्त आणली.



नाव :- आझम शेख. P.hd झाल्यावर एका सत्काराचे वेळी
गावाचे नाव :- भरे. आमच्या वसतिगृहात राहून शालेय व कॉलेज शिक्षण पूर्ण केले. रसायन शास्त्रातपुणे विद्यापीठाचे सुवर्णपादक मिळवून M. Sc केले. पुढे परदेशात जाऊन पी. एच. डी. करण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली. पी.एच.डी झाल्यावर जपानमध्ये शास्त्रज्ञ म्हणून नोकरी केली. परंतु अमेरिकेतील नोकरीची संधी सोडून मायभूमीत परत येऊन स्थायिक झाला.



नाव :- अजय महाडिक
गावाचे नाव :- कोन्ढूर. इयत्ता सातवीत असताना आई आणि वडील दोघेही मरण पावले . या अनाथ मुलाला गावकऱ्यांनी आमच्या वसतिगृहात आणून सोडले . आम्ही त्याला वसतिगृहात सांभाळून त्याचे संपूर्ण शालेय शिक्षण पूर्ण केले. आज तो नोकरी करून स्वत:च्या पायावर उभा आहे.



## आवाहन

वसतिगृहांच्या संचालनाचा वार्षिक खर्च अंदाजे रु. २५ लाख इतका आहे. संत गाडगेबाबा वसतिगृह व श्री छत्रपती शिवाजीमहाराज वसतिगृह येथील विद्यार्थ्यांच्या साधारण ३२५ दिवसांचा दैनंदिन जेवणाचा खर्च भागवण्यासाठी, बीव्हीपी शिवाजीनगर चॅरिटेबल ट्रस्ट ने सहयोग-पात्र ही योजना सुरू केली आहे. योजनेचे यश तुमच्यासारख्या परोपकारी व्यक्तीच्या मनापासून मिळणाऱ्या पाठबळावर अवलंबून आहे. या वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या जेवणाचा खर्च अंदाजे रु. ७,५००/- प्रतिदिन आहे. आपणास नम्र आवाहन की, आपण किमान एक दिवसाचा रु. ७,५००/- किं वा त्या पटीत अधिक दिवसांसाठीच्या जेवणाचा खर्च उचलून या उदात्त हेतूसाठी निधी द्यावा आणि ग्रामीण शिक्षणाच्या राष्ट्रीय कार्यात हातभार लावावा.








**Trust Details :**

**BVP Shivajinagar Charitable Trust**

Prestige Corner, First Floor, Shailesh Society, Karve Nagar, Pune 411052
Regd No: E-8191 / PUNE , Dated 11 June 2018
80 G Registration Number: CIT EXEMPTION, AADTB1160DF20192
PAN: AADTB1160D
CSR Certificate No: CSR00003908
The donation can be made by Cheque in favor of

**“ BVP Shivajinagar Charitable Trust ”**

The Bank Details are as follows:

**Account Name:** **BVP Shivajinagar Charitable Trust**
**Account Number :** **033805011859**
**Bank Name:** **ICICI Bank, Kothrud Branch**
**IFSC:** **ICIC0000338**

**Note:** Any donations made areeligible for income tax exemption u/s 80(G) of the Income Tax Act*Please provide your PAN details and transaction reference ID, Net Banking, UPI transaction to - bvpshivajinagartrust@gmail.com

**UPI Payments Accepted Scan below QR code**

or Pay to eazypay
B9RBNPABVYG5R4Z@icici

